जालना जिल्ह्यांतर्गत इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता- एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड पीएच.डी
(शिक्षणशास्त्र) पदवीसाठी सादर
करावयाचा आराखडा

संशोधक

श्रीमती नामेवार रुपाली जानकीराम

मार्गदर्शक

डॉ. श्रीमती निळेकर व्ही.के.

सादर स्थळ

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

(२०१६-२०१८)

अनुक्रमणिका

अ.क्र.	विवरण	पृष्ठ क्रमांक
१	प्रास्ताविक	३
२	समस्या विधान	४
३	संशोधनाची गरज	५
४	संशोधनाचे महत्व	६
५	संशोधनाची उद्दिष्टे	७
६	गृहितके	७
७	परिकल्पना	८
८	संशोधनाशी निगडीत चले	८
९	तांत्रिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या	८
१०	संशोधनाची व्याप्ती	९
११	संशोधनाची मर्यादा	९
१२	संशोधन पध्दती	९
१३	संशोधनाची साधने	१०
१४	संशोधनाची जनसंख्या व नमुना निवड	१०
१५	सांख्यिकीय तंत्राचा वापर	१०
१६	कार्यवाहीचे टप्पे	११
१७	वेळापत्रक	१२
१८	अंदाजपत्रक	१३
	संदर्भ ग्रंथ सूची	

❖ प्रास्ताविक :-

सध्याचे जीवन हे अत्यंत गतिमान गुंतागुंतीचे व विलक्षण धकाधकीचे बनले आहे. माणसांसमोर नवनवीन व अकल्पित आव्हाने उभी रहात आहेत, अशा परिस्थितीत समर्थपणे व समाधानाने जीवन जगता येण्यासाठी काही विशिष्ट गुणांची व कौशल्यांची विद्यार्थ्यांमध्ये रूजवण करता यावी. यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. या गुणांची व कौशल्यांची विद्यार्थ्यांमध्ये रूजवणूक करता यावी म्हणून शासनाने विविध प्रकारच्या स्पर्धात्मक परीक्षांची आखणी केली आहे.

राष्ट्राचा विकास हा राष्ट्रातील सुजाण, सुसंस्कृत व सुशिक्षित नागरिक करीत असतो. राष्ट्रातील सुजाण नागरिक घडविण्याचे कार्य करण्यासाठी व्यक्तीवर जे योग्य संस्कार होतात, तर त्या संस्काराला फुलवायचे व योग्य दिशा देण्याचे उपक्रम राबविले जातात. मात्र हे सर्व व्यक्तीला परिपूर्ण करण्यास तुटपुंजी ठरतात. त्यामुळे विद्यार्थ्याला या व्यतिरिक्त सामान्य ज्ञानाची गोडी असावी. कारण अशा विषयातून विद्यार्थ्यांची जडणघडण होते. वृत्तपत्रे, पुस्तके, ग्रंथ, दुरदर्शन, बातम्या या माध्यमातून अनेक अडचणींवर मार्ग सापडतात.

परंतू कुटुंब व शाळा या दोन्ही संस्था या सामान्यज्ञान उपक्रमासाठी विशेष वेळ देऊ शकत नाही. कारण शाळेला मर्यादा वेळेची, अभ्यासक्रम व इतर उपक्रम अंमलबजावणीसाठी सामान्यज्ञान उपक्रम विशेष तरतूद करू शकत नाही.

सामान्यज्ञान म्हणजे काय असा प्रश्न पडणे सहाजिकच आहे. या प्रश्नाचे उत्तर अतिशय व्यापक आहे. सामान्य ज्ञान हा विषय कोणत्याही बंधनात जखडलेला नाही. इतिहासातील घटना-असो की विज्ञानातील शोध किंवा अन्य विषयातील बाब असो त्या गोष्टींचा समावेश सामान्य ज्ञानातच होतो.

२१ व्या शतकातील क्रांतीमुळे जगातील कुठल्याही कोपऱ्यातील माहिती घरबसल्या मिळत आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात अनेक संध्या उज्वल भविष्य घेऊन उभ्या आहेत. मात्र या मिळविण्यासाठी स्पर्धेशिवाय पर्याय नाही. योग्य व्यक्तीच्या निवडीचा निकष आज स्पर्धा

परीक्षा घेतल्या जात आहे. या परीक्षेचे यश ज्यावर अवलंबून आहे ते म्हणजे सामान्यज्ञान याची माहिती प्रत्येकाला आवश्यक आहे.

खाजगी, शासन, राज्यसेवा, लोकसेवा अशा अनेक क्षेत्रात स्पर्धा परीक्षेला अनन्यसाधारण महत्व दिल्या जात आहे. अतिशय सामान्य मात्र असामान्य दर्जा प्राप्त करून देणारा विषय म्हणजे सामान्यज्ञान आणि यातच विद्यार्थी कमी पडतात कारण केवळ परीक्षा जवळ आल्यावरच या विषयाकडे लक्ष दिल्या जाते. विद्यार्थ्यांचा विषय अभ्यास चांगला असला तरी परीक्षेचा बॅकबोन असलेल्या सामान्यज्ञानात तो कमी पडतो. हा परिणराम टाळावयाचा असेल तर विद्यार्थ्यांमध्ये शालेय स्तरापासूनच आवड निर्माण करायला हवी कारण त्याचा फायदा भविष्यात होणार आहे. सामान्यज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे बौध्दिक व मानसिक तयारी करून घेतली जाते. शालेय जीवना पासूनच विद्यार्थ्यांच्या अभ्यासात या विषयाचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांना संधीचे अनेक मार्ग खुले होतील.

परंतू सहजच हा प्रश्न समोर येतो की, शालेय स्तरावर असा व्यापक विषय असल्यास विद्यार्थ्यांना तो झेपेल काय? याचे उत्तरही सोपे आहे. विद्यार्थ्यांचा बौध्दिक स्तर समजावून घेऊन त्यांना त्या स्तरानुसार सामान्यज्ञाना विषयी माहिती आपण देऊ शकतो. त्याचप्रमाणे शालेय स्तरावर अनेक उपक्रम राबवून सामान्य ज्ञानाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आवड व महत्त्वाकांक्षा, विकास आपण निर्माण करून शकतो आणि सामान्य ज्ञानाचे महत्व त्यांना पटऊन देऊ शकतो. म्हणजे विद्यार्थी जीवनाच्या कुठल्याही क्षेत्रात आत्म विश्वासाने जगू शकेल व ज्ञानाच्या बाबतीत एक चतुरस्त्र विद्यार्थी म्हणून समोर येऊ शकतील, हाच दृष्टीकोन समोर ठेऊन संशोधकाने सदरील विषयाची निवड केली.

❖ समस्या विधान :-

"जालना जिल्ह्यांतर्गत इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवून त्यांची परिणाम कारकता तपासणे."

❖ संशोधनाची गरज :-

सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेत टिकण्यासाठी स्वत:चे ज्ञान अद्ययावत असावयास हवे यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करणे कमप्राप्त झाले आहे. स्पर्धा परीक्षेचे महत्व व त्या दृष्टीने परीक्षेचा महत्वाचा घटक असलेल्या सामान्य ज्ञानाचो महत्व नाकारून चालणार नाही. सद्य परिस्थितीचा विचार केल्यास आपल्या लक्षात येईल की, आजच्या घडीला शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञानाविषयी पुरेशी माहिती नाही. या विद्यार्थ्यांना नवोदय, स्कॉलरशिप, प्रज्ञाशोध परीक्षा (NTS, MTS) अशा अनेक परीक्षा शालेय स्तरावर द्याव्या लागतात व त्यांना ज्ञानाचा अभ्यासही करावा लागतो. हा अभ्यास थोड्याफार प्रमाणात शिक्षकांद्वारे दिल्याही जातो. मात्र खरे पाहिले तर या परीक्षेची तयारी ही परीक्षेच्या काही दिवस अगोदर सुरू सुरू केली जाते. त्याचा परिणाम आपल्याला निकालाद्वारे पहावयास मिळतो. बहुतेक वेळा हा निकाल असमाधानकारक असतो. त्यामुळे या निकालाचा दोष कुणाला द्यायचा हा प्रश्न पडतो आणि ऐन परीक्षेच्या काळात या अभ्यासक्रमाला व्याप विद्यार्थ्यांना झेपत नाही. असे नेहमी ऐका यला मिळते. मात्र या विषयाचे ज्ञान असे एकदम देऊन त्यांच्यावर या विषयाचा भाडीमार केल्यास त्यांच्या बुध्दीला झेपत नाही व परिणामी कमी निकाल पहावयास मिळतो.

अशा प्रकारे निकाल कमी लागणे, विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम न झेपणे या सारख्या समस्यांवर उपाय काढण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

सामान्य ज्ञानावर आधारित विविध उपक्रमांमुळे विद्यार्थी नेमका कुठे चुकतो हे शिक्षकांच्या लक्षात येईल व त्यानुसार विद्यार्थ्यांची अडचण सोडविण्यास मदत होइल व आपला हेतू साह्य होइल म्हणून प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे. इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून तयारी उत्तम रित्या होण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे ग्रामीण विद्यार्थ्यांना देखिल शहरी भागांतील विद्यार्थ्यांप्रमाणेच आपल्या स्वत:चा विकास साधता येण्यासाठी व सामान्य ज्ञानातील विविध घटकात प्रगल्भता येण्यास प्रयत्न करणे आवश्यक म्हणून प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

अशा प्रकारे सामान्यज्ञानावर आधारित उपक्रम विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने वातावरण निर्मिती किंवा स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी म्हणता येईल अशा उपक्रमांचा विद्यार्थ्यांना फायदा होइल. म्हणून प्रस्तुत विषयाची निवड क्रमप्राप्त ठरते.

❖ संशोधनाचे महत्व :-

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी व विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांना विविध विषयांच्या सामान्य ज्ञानाची माहिती असणे गरजेचे आहे. नवोदय विद्यालया अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा, राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा, दिव्य ज्ञान स्पर्धा या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान असणे गरजेचे आहे. या सर्व विषयांविषयी ज्ञान विद्यार्थ्यांना आवश्यक आहे.

आपल्या आजुबाजूच्या चालू असलेल्या घडामोडी क्रिडा क्षेत्रासंदर्भात बातम्या तसेच जागतिक स्तरावरील घडामोडी इ. विषयी माहिती होण्यासाठी सामान्यज्ञानाची गरज आहे. आजच्या परिस्थितीचे जर अवलोकन केले तर सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांसाठी सामान्यज्ञान या महत्त्वाच्या घटकांचा अंतर्भाव आहे. कारण या सामान्य ज्ञानातून विद्यार्थ्यांची जडणघडण होत असते. या सर्व प्रक्रियेतूनच विद्यार्थी प्रथम राष्ट्रस्तरावर आणि त्यानंतर विश्वपातळीवर विचार करू लागतो. म्हणून सामान्यज्ञान विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला परिणामकारक ठरू शकते.

एकदा का विद्यार्थ्यांमध्ये सामान्यज्ञानासंबंधी उपक्रमांची अंमलबजावणी सुरू झाली तर विद्यार्थ्यांना सर्वप्रथम सामान्य ज्ञानाची खोली कळायला सुरूवात होते. आणि हे कळल्यावर विद्यार्थी स्वत:ची उद्दिष्टे ठरवायला समर्थ बनतील. सामान्य ज्ञानाची गरज काय आहे हे उमगले तर विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञानाचे महत्व पटऊन देणे सोईचे जाईल. प्रत्येक विद्यार्थी स्वत:चे भविष्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीने या विषयाकडे बघेल. ही सुरक्षा म्हणजे स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी ज्ञानाची स्वत:कडे जमा केलेली राशीच म्हणायला हरकत नाही. याचा उपयोग हा केव्हाही, कुठेही आजमावू शकेल. अशा विविध कार्यामधून विद्यार्थ्यांना सामान्यज्ञान उपक्रमासंबंधी माहिती मिळेल व शिक्षकांना एक दिशा प्राप्त होईल. विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी त्यांच्या बौध्दिक पातळीवर प्रयत्न केले जातील.

सामान्यज्ञानाचा विद्यार्थ्यांना भविष्यात चांगले जीवन जगण्यासाठी खूप फायदा होईल यात शंका नाही. कारण जगात अनेक मोठमोठ्या पदांवर जाण्यासाठी आतापासून अभ्यासू वृत्ती सामान्य ज्ञानाच्या अभ्यासामुळेच वाढते परिणामी आत्मविश्वास देखिल वाढतो.

सामान्यज्ञानाचा फायदा घेऊन विद्यार्थी बहुदिश होईल व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्वतःला सिद्ध करण्यासाठी अपाल्या ज्ञानाचे प्रदर्शन करेल. आपले ज्ञान अद्यावत पाहिजे यासाठी सामान्य ज्ञानाशिवाय पर्याय नाही. कारण प्रत्येक क्षेत्रातील ज्ञान म्हणजे सामान्य ज्ञान होय. यामुळे विद्यार्थी अष्टपैलू बनू शकेल या विषयाचे ज्ञान हो आवड निर्माण होईल व दैनंदिन जीवनातील व्यवहारापासून ते भविष्याच्या दृष्टिने असलेल्या स्पर्धा परीक्षेपर्यंत या विषयाचा उपयोग होईल स्वतःजवळ ज्ञानाचा, आत्मविश्वासाचा संग्रह असेल तर स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊ शकेल अशी अनेक उपक्रमाद्वारे आपण विद्यार्थ्यांत सामान्यज्ञानाविषयी गोडी निर्माण करू शकतो. हेच या संशोधनाचे महत्व सांगता येईल.

❖ संशोधनाची उद्दिष्टे :-

१. जालना जिल्ह्यांतर्गत इयत्ता नववीच्या विद्यार्थाच्या सामान्यज्ञानाची सद्यस्थिती अभ्यासणे.

२. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी विविध उपक्रम तयार करणे.

३. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.

४. विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता तपासणे.

५. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

❖ गृहितके :-

१. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान आवश्यक आहे.

२. सर्व विषयांमधून विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास व्हावा हे अपेक्षित आहे.

३. विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी शालेय स्तरापासूनच विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

❖ परिकल्पना :-

इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविल्यास विद्यार्थ्यांमध्ये सामान्यज्ञानाची वाढ होईल.

❖ संशोधनाची निगडीत चले :-

१. **स्वाश्रयी चल :-** सामान्यज्ञान अद्यावत ठेवण्यासाठी येणाऱ्या अडचणींवर राबविले जाणारे विविध उपक्रम.

२. **पराश्रयी चल :-** विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानात होणारी वाढ.

❖ तांत्रिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या :-

१. **जालना जिल्हा :-** महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी एक जिल्हा ज्याच्या पुर्वेस परभणी, पश्चिमेस औरंगाबाद असून १९.५० अक्षांश उत्तर व ७५.५८ रेखांश पूर्व या ठीकाणावर आहे.

२. **इयत्ता ९ वी चे विद्यार्थी :-** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार १०+२+३ या आराखड्यातील १० या स्तराचे ५+३+२ मधील इयत्ता नववी च्या वर्गात अध्ययन करणारे विद्यार्थी.

३. **सामान्यज्ञान :-** अंकगणित, बुध्दीमत्ता चाचणी, पर्यावरण, चालू घडामोडी, विज्ञान, इतिहास, राज्यशास्त्र, नागरीकशास्त्र इत्यादी विषयांसंबंधीची स्थानिक पातळीपासून जागतिक पातळीपर्यंतची माहिती.

४. **उपक्रम :-** नाविन्यपूर्ण सामान्यज्ञानाविषयक कार्यक्रमाची वैशिष्ट्यपूर्ण अंमलबजावणी व इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी राबविले जाणारे विविध उपक्रम.

उदा. सामान्यज्ञान चाचणी, संदर्भ साहीत्य वाचन, बुध्दीमत्ता चाचणी कृतिसत्र, स्वयंअध्ययन मार्गदर्शन, प्रश्नमंजुषा, शब्दकोडी, अभ्यासिका, ज्ञानारचनेवर आधारित उपक्रम, कृतियुक्त अध्ययन उपक्रम, इ.

❖ संशोधनाची व्याप्ती :-

१. **स्थळ व्याप्ती :-** प्रस्तुत संशोधन सामान्यज्ञान अध्यापन क्षेत्राशी निगडीत असून जालना जिल्ह्यातील इयत्ता नववीतील विद्यार्थी यात व्याप्त आहे.

२. **कालावधी व्याप्ती :-** प्रस्तुत संशोधन हे सन २०१६-१८ या शैक्षणिक कालावधी शी संबंधित आहे.

३. **आशय घटक व्याप्ती :-** प्रस्तुत संशोधन सामान्यज्ञान वाढीसाठी उपक्रमांची अंमलबजावणी यासाठी व्याप्त आहे.

४. **नमुना व्याप्ती :-** प्रस्तुत संशोधनासाठी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांची निवड केली आहे.

❖ संशोधनाची मर्यादा :-

१. **स्थळ मर्यादा :-** प्रस्तुत संशोधन हे जालना जिल्ह्यांतील इयत्ता नववीच्या वर्गापुरतेच मर्यादित असून सामान्यज्ञान वाढीसाठी अध्यापन उपक्रम अंमलबजावणीच्या क्षेत्रापुरतेच मर्यादित आहे.

प्रस्तुत संशोधनात अनुदानित व स्थानिक स्वराज्य संस्थातंर्गत व्यवस्थापन करीत असलेल्या शाळांचा समावेश आहे.

२. **कालवधी मर्यादा :-** प्रस्तुत संशोधन हे सन २०१६ ते २०१८ या कालावधीपुरतेच मर्यादित आहे.

३. **आशय मर्यादा :-** प्रस्तुत संशोधनात सामान्यज्ञानातील खालील घटकांचा समावेश होईल. चालू घडामोडी, क्रिडा विज्ञान, इतिहास, भूगोल, बुध्दिमत्ता, पर्यावरण, साहित्य, कला संगणक इत्यादी.

❖ संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्रयोजकाने प्रायोगिक संशोधन पध्दतीची निवड केली असून एकल गट अभिकल्पाची निवड केली आहे.

❖ संशोधनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने चाचणी या तंत्राची निवड केली आहे. कार्यात्मक अभिकल्पाद्वारे एकलगटाची निवड केली जाणार असून विद्यार्थ्यांना पूर्व व उत्तर चाचणी देण्यात येईल.

❖ संशोधनाची जनसंख्या व नमुना निवड :-

१. जालना जिल्ह्यांतर्गत जि.प. प्रशाला व अनुदानित माध्यमिक शाळेतील १३३० विद्यार्थी ही जनसंख्या आहे.

२. माध्यमिक शाळेतील इयत्ता ९ वीत शिकणारे विद्यार्थी जनसंख्या आहे.

३. जालना जिल्ह्यातील ८ तालुके त्याचे ४ झोन व प्रत्येक झोन मध्ये १ जिल्हा परिषद प्रशाला व एक अनुदानित शाळा अशा १६ शाळा रचना यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने नमुना निवड करण्यात येईल.

४. प्रत्येक शाळेतून २५ विद्यार्थी याप्रमाणे १६ शाळांमधील ४०० विद्यार्थी ही प्रस्तुत संशोधनाची नमुना निवड आहे.

❖ सांख्यिकीय तंत्राचा वापर :-

प्रस्तूत संशोधनाचा सांख्यिकीय तंत्राच्या वापरात पूर्व चाचणी व उत्तरचाचणीच्या संपादणूकीवरून माध्यमान, घटकनिहाय माध्यमान, प्रमाण विचलन, क्रांतिक गुणोत्तर या सांख्यिकीय तंत्राचा योग्य तेथे वापर करण्यात येईल. तसेच पूर्व व उत्तर चाचणी च्या माध्यमाना तील फरकावरून 't' मध्य काढण्यात येईल.

❖ कार्यवाहीचे टप्पे :-

प्रस्तुत संशोधनाची प्रत्यक्ष कार्यपध्दती

↓

संशोधन समस्या निश्चिती

↓

आराखडा निर्मीती

↓

आराखडा सादरीकरण

↓

आराखड्यास अंतिम मंजूरी

↓

संबंधित व पूर्व संशोधनाचा आढावा

↓

जनसंख्या व न्यादर्श निवड

↓

साधननिश्चिती व निर्मीती

↓

पथदर्शक अभ्यास

↓

माहिती संकलन

↓

माहतीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

↓

निष्कर्ष आणि शिफारशी

↓

अहवाल लेखन

↓

या प्रकारे प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यात आले.

❖ वेळापत्रक :-

अ.क्र.	तपशील	कालावधी
१	आराखडा निर्मीती	दोन आठवडे
२	आराखडा मंजुरी	दोन महिने
३	पथदर्शक अभ्यास	दोन महिने
४	संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा	तीन महिने
५	माहितीचे संकलन	तीन महिने
६	माहितीचे विश्लेषण	तीन महिने
७	हस्तलिखीत अहवाल	दोन महिने
८	मार्गदर्शक परीक्षण व सुधारणा	एक महिना
८	अहवाल टंकलेखन व बांधनी	दोन महिना
९	सादरीकरण	

❖ अंदाज पत्रक :-

अ.क्र.	तपशील	अपेक्षित खर्च
१	आराखडा निर्मीती	५००
२	पुस्तक खरेदी	५,०००
३	साधन निर्मीती	५,०००
४	प्रवास खर्च	१०,०००
५	टपाल खर्च	१,०००
६	अहवाल लेखन	२०,०००
७	अहवाल बांधनी	२,०००
८	इतर खर्च	५,०००
	एकूण	**४८,५००**

* संदर्भ ग्रंथ सूची *

१. कुंडले, सुरेखा आणि इ. (२००५) एम.एड. संशोधन मार्गदर्शिका भाग १ व भाग २. नाशिक : य.च.म.मु.विद्यापीठ.

२. कुंडले, म.बा. (१९९६). शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र. पुणे : श्री विद्या प्रकाशन.

३. पंडित, बन्सी बिहारी (२००५). शिक्षणातील संशोधन. पुणे : नित्य नुतन प्रकाशन.

४. भिंताडे, वि.रा.(२००६). शैक्षणिक संशोधन पध्दती. पुणे : नित्य नुतन प्रकाशन.

(डॉ. व्ही.के. निळेकर)
संशोधन मार्गदर्शक तथा
माजी सहयोगी प्राध्यापिका,
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
परभणी.

संशोधिका
श्रीमती नामेवार रूपाली जानकीराम